आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
५ फेब्रुवारी २०२५ बुधवार

**ठळक बातम्या**

- दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी मतदान सुरू, सकाळी अकरा वाजेपर्यंत १९ पूर्णांक ९५ शतांश टक्के मतदान
- देशव्यापी जलसंधारण यात्रेला आजपासून सुरुवात
- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू
- गाझा पट्टी ताब्यात घेऊन तिचा आर्थिक विकास करण्याची योजना आखत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचं वक्तव्य

**आणि**

- ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राची सर्वाधिक ७८ पदकांची कमाई

**<><><><><>**

दिल्ली विधानसभेच्या ७० जागांसाठी आज मतदान होत असून सकाळी ११ वाजेपर्यंत एकूण १९ पूर्णांक ९५ शतांश टक्के मतदान झालं आहे. सकाळी सात ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान होणार आहे.

या निवडणुकीसाठी एकूण ६९९ उमेदवार रिंगणात असून १ कोटी ५६ लाखांहून अधिक मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीतपणे पार पडावी यासाठी चोख बंदोबस्त करण्यात आला असून, निवडणूक आयोगानं १ लाख ८० हजारापेक्षा जास्त कर्मचारी तैनात केले आहेत.

या निवडणुकीत अनेक प्रमुख नेत्यांचं राजकीय भवितव्य निश्चित होणार आहे. यात आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल, दिल्लीच्या मुख्यमंत्री

आतिशी आणि मंत्री गोपाल राय, भाजपचे विजेंदर गुप्ता, परवेश वर्मा, रमेश बिधुरी आणि कैलाश गहलोत यांचा समावेश आहे.

**<><><><><>**

**राष्ट्रपती** द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदिप धनखड, सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश संजीव खन्ना, केंद्रीय मंत्री एस. जयशंकर आणि हरदीप सिंह पुरी यांनी मतदानाचा अधिकार बजावला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, दिल्लीचे नायब राज्यपाल विनय कुमार सक्सेना, आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री अतिशी यांनीही मतदान केलं. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार, निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीर सिंग संधू आणि ज्ञानेश कुमार, प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव पी. के. मिश्रा, दिल्ली पोलिस आयुक्त संजय अरोरा यांनी देखील सकाळीच मतदानाचा हक्क बजावला. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिल्ली विधानसभा निवडणुकीत मतदारांनी मतदान करण्याचे आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीत बनावट मतदान रोखण्यासाठी निवडणूक आयोग आणि दिल्ली पोलिसांकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. निवडणूक आयोगाकडून सर्व मतदान केंद्रावर सीसीटीव्हीद्वारे लक्ष ठेवलं जात आहे. दरम्यान, दिल्ली पोलिसांनी बेकायदेशीर बांगलादेशी आणि रोहिंग्याविरुद्ध विशेष मोहीम सुरू केली आहे. राजधानीत बेकायदेशीरपणे राहणाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी, त्यांना अटक करण्यासाठी आणि त्यांना हद्दपार करण्यासाठी अनेक भागात छापे टाकले आहेत. निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडण्यासाठी ३० हजारांहून अधिक पोलिस कर्मचारी आणि निमलष्करी दलाच्या २२० तुकड्या दिल्लीत तैनात करण्यात आल्या आहेत.

दरम्यान, मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज दिल्ली विधानसभा निवडणुक सुरळीत पार पाडण्यात सहभागी असलेल्या मतदान अधिकारी, सुरक्षा दल आणि इतर कर्मचाऱ्यांच्या प्रयत्नांचं कौतुक केलं. दिल्लीत न्यू मोती बाग इथं मतदान केल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**<><><><><>**

केंद्रसरकारतर्फे आजपासून देशव्यापी जलसंधारण यात्रा काढण्यात येत असून त्याचं उद्घाटन केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते होणार आहे. नवी दिल्लीत काल पत्रकार परिषदेत चौहान यांनी ही माहिती दिली. 'जल लाये, धनधान्य' अशी या यात्रेची मध्यवर्ती संकल्पना आहे. ही यात्रा ६० ते ९० दिवसांत देशभरातल्या ८०५ प्रकल्पांची माहिती देत फिरणार आहे. २६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशातल्या ६ हजार ६७३ ग्रामपंचायतींना ही यात्रा भेट देईल. ही यात्रा प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० चा भाग आहे. जलसंधारण आणि मातीच्या नापिक होण्याबद्दल जनजागृती करणं हा यात्रेचा उद्देश आहे, असं मंत्री चौहान यांनी सांगितलं. या यात्रेत लोकांनी मोठ्या संख्यने सहभागी व्हावं असं आवाहनही त्यांनी केलं.

**<><><><><>**

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या चलनविषयक धोरण समितीची तीन दिवसीय बैठक आजपासून मुंबईत सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक येत्या शुक्रवारपर्यंत सुरू राहणार आहे. शुक्रवारी सकाळी मल्होत्रा व्याजदरांबाबतचे समितीचे निर्णय जाहीर करतील. फेब्रुवारी २०२३ पासून रिझर्व्ह बँकेने रेपो दर साडे सहा टक्क्यांवर कायम ठेवला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेतून शंभरपेक्षा जास्त भारतीय अवैध स्थलांतरितांना हद्दपार करण्यात आलं असून ते आज पंजाबमधे अमृतसर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचतील. विमानतळावर सर्व प्रशासकीय  व्यवस्था केल्याचं उच्चपदस्थ अधिकाऱ्यानी दिली.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये सुरू असलेल्या ३८व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये महाराष्ट्राने सर्वाधिक ७८ पदकांची कमाई केली आहे. त्यात १६ सुवर्ण, ३४ रौप्य आणि २८ कास्यपदकांचा समावेश आहे. पदकतालिकेत महाराष्ट्राचं तिसरं स्थान कायम असून पहिल्या स्थानावर कर्नाटक तर दुसऱ्या स्थानावर सेना दल संघाचा समावेश आहे. तसंच, मध्यप्रदेश, तामिळनाडू, मणिपूर, हरियाणा, केरळ, दिल्ली आणि पंजाब यांचा पहिल्या दहा संघांत समावेश आहे. यजमान उत्तराखंडचा संघ २७ पदकांसह पदकतालिकेत पंधराव्या स्थानावर आहे.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज प्रयागराज इथं महाकुंभ मेळ्यातल्या त्रिवेणी संगमावर पवित्र स्नान केलं. त्यानंतर त्यांनी उत्तर प्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्यासोबत बोटीतून संगमावर फेरी मारली. गंगा, यमुना आणि सरस्वती या नद्यांच्या त्रिवेणी संगमावर प्रधानमंत्र्यांनी पूजा केली.

त्रिवेणी संगमावरचं स्नान ही दैवी अनुभूती असून त्यावेळी कुंभमेळ्यात सहभागी झालेल्या कोट्यवधी भाविकांप्रमाणे आपलं मनही भक्तिमय झालं होतं, अशा भावना प्रधानमंत्र्यांनी समाज माध्यमावर व्यक्त केल्या. जीवनदायिनी गंगा देशवासियांना शांती, सद्बुद्धी, उत्तम आरोग्य आणि सौहार्दाचा आशीर्वाद देईल, असंही मोदी आपल्या संदेशात म्हणाले आहेत.

**<><><><><>**

अमेरिका युद्धग्रस्त गाझा पट्टी ताब्यात घेण्याची आणि तिचा आर्थिक विकास करण्याची योजना आखत असल्याचं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू आणि ट्रम्प काल व्हाईट हाऊसमध्ये संयुक्त पत्रकार परिषदेत बोलत होते. या प्रदेशातल्या आर्थिक विकासामुळे इथल्या नागरिकांना अमर्यादित रोजगार आणि घरं उपलब्ध होतील असा दावा त्यांनी केला.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी संयुक्त राष्ट्र मानवाधिकार परिषदेतून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. यामुळे संयुक्त राष्ट्र संस्थेमार्फत पॅलेस्टिनी निर्वासितांना भविष्यात दिल्या जाणाऱ्या निधीवर बंदी घालण्यात आली आहे. अमेरिकेने दुसऱ्या महायुद्धानंतर भविष्यातील जागतिक संघर्ष रोखण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला चालना देण्यासाठी संयुक्त राष्ट्रांची स्थापना करण्यासाठी मदत केली होती. मात्र संयुक्त राष्ट्र संस्था या अमेरिकेच्या हितसंबंधांविरुद्ध काम करत असून त्यांच्या मित्र देशांविरुद्ध प्रचार करत असल्याचं त्यांनी यावेळी म्हटलं.

**<><><><><>**

स्वीडनमधे राजधानी स्टॉकहोम जवळ २०० किलोमीटर परिसरातल्या ऑरेब्रो गावात एका प्रौढ शिक्षण केंद्रात काल झालेल्या गोळीबारात १० जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये गोळीबार करणाऱ्या व्यक्तीचाही समावेश आहे. स्वीडनच्या इतिहासातली ही सर्वात मोठी सामूहिक हत्या आहे, असं स्वीडनचे पंतप्रधान उल्फ क्रिस्टर्सन यांनी म्हटलं आहे.

**<><><><><>**

दोन ग्रँडस्लॅम विजेती आणि महिला क्रमवारीत अग्रमानांकित राहिलेली टेनिसपटू सिमोना हॅलेप हिनं व्यावसायिक टेनिसमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. तिचा मायदेश रोमेनियातल्या स्पर्धेच्या पहिल्याच फेरीत पराभव झाल्यानंतर तिनं हा निर्णय जाहीर केला.

<><><><><>

अर्जेंटिना इथं सुरू असलेल्या रोझारियो चॅलेंजर टेनिस स्पर्धेत पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत भारताच्या सुमित नागल याचा सामना आज बोलिव्हियाच्या ह्यूगो डेलिएन याच्याशी होणार आहे.

<><><><><>

आकाशवाणीचे माजी वृत्त निवेदक वेंकटरमण यांचं काल रात्री चेन्नई इथं निधन झालं. ते १०२ वर्षांचे होते. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाल्याची बातमी तमिळ भाषेत आकाशवाणीवरून त्यांनी पहिल्यांदा दिली होती. ही बातमी रेडिओ सिलोनवरून पहाटे पावणे सहा वाजता प्रसारित झाली होती. वेंकटरमण यांनी आकाशवाणीसाठी नियमित आणि प्रासंगिक कलाकार म्हणून ६४ वर्षे काम केलं.